**तक्रार युएलपी. क्र. ४/२०२४** **निशाणी सी—१०**

**शपथेवर उलटतपास अर्जदारातर्फे राठी ॲड.**

**१०.** २००३ पासुन मी लिपीक म्हणुन कामास होतो व २०२० पासुन सामान्य प्रशासन विभागात आहे. मला पुरावा देण्यासाठी लेखी अधिकार पत्र दिलेले नाही. मी मराठी विषयात एम.ए. केले आहे. माझे शपथपत्र वकीलांनी तयार केल्यानंतर मी सही केली. मला इंग्रजी थोडीफार लिहिता वाचता येते. याकामी दाखल केलेला संपुर्ण पुरावा मला समजला. मी तक्रारदाराची संपुर्ण फाईल पाहिली आहे. मी चौकशीचे कागदपत्र पाहिले आहेत. चौकशीमध्ये मी हजर नव्हतो व साक्षीदार नाही. माझे शपथपत्रातील परिच्छेद ३ मधील मजकुर मला व्यक्तीशः माहिती नाही. ॲन्टीकरप्शन ब्युरोने जी कारवाई केली ती व्यक्तीशः मला माहिती नाही. चौकशीमधील माहिती मला व्यक्तीशः नाही. तक्रारदाराविरुध्द सत्र न्यायालयात प्रकरण दाखल आहे. ॲन्टीकरप्शन ब्युरोने गुन्हा नोंदवतेवेळेस मला बोलविले नाही व कार्यालयातुन कोणाला बोलविले असल्यास मला माहिती नाही. चौकशीत कोणता साक्षीदार कधी तपासला याची मला माहिती नाही. तक्रारदार माझे पुर्वी सेवेत लागला होता. तक्रारदाराविरुध्द महानगर पालिकेचे आर्थिक नुकसान केले व बदनामी केली असे आरोप आहेत. याकामातील चौकशी व्यतिरिक्त तक्रारदाराविरुध्द पुर्वी चौकशी झालेली नाही. मी चौकशी अधिकारी यांचे निष्कर्ष वाचले नाहीत. मला या प्रकरणाची व्यक्तीशः काहीही माहिती नाही. तसेच माझे समक्ष काहीही घडले नाही. मी माझे जबाबात कागदपत्रांच्या आधारे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदाराने कोणताही गैरव्यवहार केला नाही. हरीष चावला यांनी काय साक्ष दिली याची माहिती घेतली नाही. ॲन्टीकरप्शन ब्युरोने दिलेली तक्रार व त्याआधारे वर्तमानपत्रात आलेली बातमी याव्यतिरिक्त तक्रारदाराविरुध्द कोणतेही आरोप नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

**समक्ष,**

SATISH KACHRULAL BANGAD

Digitally signed by SATISH KACHRULAL BANGAD
Date: 2025.04.07 12:33:01 +0530

**(एस. के. बांगड)**
**न्यायाधिश,**
**कामगार न्यायालय, अकोला.**

**दिनांकः— ०५/०४/२०२५.**